राणेंनी संसदेतील कोकणची प्रतिष्ठा धुळीस मिळवली
आमदार वैभव नाईक यांचा राणेंवर हल्लाबोल

■ कणकवली

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे बॅरिस्टर नाथ पै, प्रा. मधु दंडवते, सुरेश प्रभु यांसारख्या सुसंस्कृत व विद्वान उमेदवारांनी लोकसभेत प्रतिनिधित्व केले आहे. बॅ. नाथ पै यांचे सभागृहातील भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू स्वतः उपस्थित असायचे. मधु दंडवते आणि सुरेश प्रभु यांच्या कार्यकर्तृत्वाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला. त्यामुळे हा मतदारसंघ विद्वान नेत्यांचा मतदारसंघ म्हणून देशभरात प्रसिद्ध आहे. मात्र नारायण राणेंनी आपल्या केंद्रीय मंत्रिपदाच्या काळात संसदेतील कोकणची प्रतिष्ठा धुळीस मिळवली आहे.असा आरोप आमदार वैभव नाईक यांनी केला. राणेंनी केंद्रीय मंत्री असून देखील शिवसेना आमदार भास्कर जाधवांना चोप देण्याची भाषा केली. एका केंद्रीय मंत्र्याला हे वर्तन नक्कीच शोभणारे नाही.

राणेंनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कानाखाली मारण्याची भाषा केल्यामुळे त्यांना केंद्रीय मंत्रिपदी विराजमान असताना अटक झाली होती. अगदी अलीकडेच राज्यसभेतील भाजप खासदार कार्तिकेय शर्मा यांनी एमएसएमई क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणाबाबत राज्यसभेत इंग्रजीत प्रश्न उपस्थित केला असता राणेंना त्यांच्या प्रश्नाचा अर्थच समजला नसल्यामुळे त्यांनी एमएसएमईमध्ये निर्यात कशा पद्धतीने वाढणार अशा आशयाचे असंबंध उत्तर दिले. शेवटी राज्यसभा उपाध्यक्ष हरिवंश सिंह त्यांच्या मदतीला धावले आणि त्यांनी इंग्रजीतील प्रश्न त्यांना हिंदीत समजावून सांगत वेळ मारून नेली. अशा प्रकारे राणेंच्या अज्ञानीपणामुळे संसदेतील कोकणाची प्रतिष्ठा पूर्णपणे धुळीस मिळालेली आहे. राणेंना खासदारांनी इंग्रजीत विचारलेले प्रश्नच समजत नसतील तर असा माणूस रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे आणि पुढे जाऊन देशाचे प्रतिनिधीत्व कसे काय करणार? राणेंना संसदेत पाठवून कोकणच्या इभ्रतीचे आणखीन धिंडवडे काढण्यापेक्षा त्यांना रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात पराभूत करणे कोकणी जनतेच्या दृष्टीने हितावह ठरेल, असे नाईक म्हणाले.

खोडाळ्यात जगदंबा उत्सव सुरू!
यंदा कुस्त्यांचा फड होणार नाही

■ पालघर

शेकडो वर्षांची परंपरा असलेला पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील जगदंबा (बोहाडा) उत्सव आजपासून सुरू झाला. खोडाळा शहरात सुरू झालेला हा पारंपरिक उत्सव ४ मे पर्यंत चालणार असून यंदा मात्र कुस्त्यांचा फड रद्द करण्यात आला आहे.

हा जगदंबा उत्सव बरीच वर्षे खंडित झाला होता. मात्र जुन्या जाणत्या मंडळींनी पुढाकार घेऊन हा उत्सव दोन वर्षांपूर्वी पुन्हा सुरू केला आहे. यंदाचे या उत्सवाचे तिसरे वर्षे आहे. आज पहिल्या दिवशी श्री गजाननाचे विधिवत पूजन करून मिरवणूक काढण्यात आली. उद्या ३ मे रोजी लहान बोहाडा आणि तिसऱ्या दिवशी म्हणजे ४ मे रोजी मोठा बोहाडा रात्रभर झाल्यानंतर ५ मे रोजी सकाळी ९ वाजता महापूजा, महिषासूर व देवीचे युद्ध आणि मिरवणूक काढली जाणार आहे.

मिरवणुकीनंतर होणारा कुस्त्यांचा फड यंदा रद्द करण्यात आला आहे. मिरवणुकीने या उत्सवाची सांगता होणार आहे. या उत्सवात रात्रीच्यावेळी सोंगे नाचविली जातात.

सिन्नरमध्ये बहीण-भावाचा डबक्यात बुडून मृत्यू

■ सिन्नर

सिन्नर तालुक्यातील रामनगर येथे डबक्याजवळ खेळणाऱ्या बहीण भावाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना काल सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास घडली. मृतातील भाऊ ५ तर बहीण ४ वर्षांची आहे.

तालुक्यातील रामनगर येथे गावाजवळच असणाऱ्या डबक्याजवळ आयुष्य रवींद्र बंडकर (५) व धनश्री रवींद्र बंडकर (४) हे बहीण-भाऊ आणि एक लहान मुलगा खेळत होते. यावेळी खेळताना पाय घसरून डबक्यात बुडून या दोघांचा मृत्यू झाला. सोबत खेळणारा मुलगा त्या ठिकाणी रडत बसला होता. गावात बस आल्यानंतर एक प्रवासी पायी जात असताना त्याला रडणारा मुलगा दिसला. या प्रवाशाने त्याच्याकडे विचारपूस केल्यानंतर दोन जण डबक्यात बुडाल्याची माहिती उघड झाली. या प्रवाशाने आरडाओरडा केल्यानंतर गावातील नागरिक मदतीसाठी धावून आले. या भाऊ बहिणीला डबक्यातून बाहेर काढण्यात आले. तातडीने त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाला होता. या दोन्ही भावंडांचे आईवडील मोलमजुरी करत होते. या घटनेची माहिती समजल्यानंतर रामनगर गावावर शोककळा पसरली होती.

गोरेगावमधील टोपीवाला मंडईचा पुनर्विकास खर्च ३० कोटींनी वाढला

■ मुंबई

गेल्या सहा वर्षांपासून गोरेगावमधील पालिकेच्या टोपीवाला मंडईच्या पुनर्विकासाचे काम रखडले आहे. मात्र आता या कामासाठी पुन्हा निविदा मागविल्या असून, त्यामध्ये या प्रकल्पाचा खर्च ३० कोटींनी वाढविण्यात आला आहे. आता १३० कोटींचा अपेक्षित खर्च १६० कोटींवर गेला आहे.

गोरेगाव रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेला असलेल्या टोपीवाला मंडईचा पुनर्विकास करण्याची पालिकेची योजना आहे.

ही मंडई २०१८ मध्ये पाडण्यात आली आहे. गेल्या सहा वर्षांपासून हा पुनर्विकासाचा मुद्दा रेंगाळत पडला आहे. पालिकेच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी १३१ कोटी रुपये अपेक्षित खर्च असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र आता या प्रकल्पाचा खर्च १६० कोटींहून अधिक करून तशा निविदा मागविण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पुनर्विकास झाल्यावर या मंडईच्या पहिल्या व दुसऱ्या माळ्यावर पार्किंग सुविधा आणि तळमजल्यावर अद्ययावत मंडई, निवासी डॉक्टरांसाठी खोल्या असणार आहेत. तळमजल्यासह १६ मजल्यांची ही इमारत असणार आहे. इमारत परिसरात सीसीटीव्ही, योगा केंद्र, शॉपिंग सेंटर, सभागृह आणि व्यायामशाळा असणार आहे.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. रेमंड डायस, न्यू करंजीया को - ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि.** चे पुर्वीचे भाडेकरू, इमारतीच्या पहिल्या मजल्यावर स्थित युनिट क्र. १० बी च्या संदर्भात, त्याची प्रिमायसेस **श्रीमती रोमुलडीना लुसीयानो फर्नांडीस** यांना १९९८ मध्ये विकली. म्हणून **श्रीमती रोमुलडीना लुसीयानो फर्नांडीस मालक** यांनी अनुक्रमीत क्रमांक १९१ ते २०० (दोन्ही समाविष्ट) धारक प्रत्येकी रु. ५०/- च्या पाच शेअर्ससाठी क्र. २० धारक शेअर प्रमाणपत्रासह, **न्यू करंजीया हाऊस प्रिमायसेस को - ऑप. सोसायटी लि., ६५३-ए, जेएसएस रोड, धोबी तलाव, मुंबई -** ४००००२ च्या पहिल्या मजल्यावरील स्थित, युनिट क्र. १०-बी मधील अधिकार, हक्क आणि हित हस्तांतरणासाठी सोसायटीला संपर्क केला आहे.

कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विरूध्द विक्री, अदलाबदल, तारण, प्रभार, उपहार, वारसाहक्क, ताबा, धारणाधिकार किंवा अन्यथा, कशाहीप्रकारे कोणताही दावा असल्यास, सदर सूचना प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसात, निम्नस्वाक्षरीकारांना खालील नमूद पत्त्यावर दाव्याच्या संदर्भातील आधारभूत कागदपत्रांसोबत लेखी कळविण्याची विनंती करण्यात येत आहे. कसूर केल्यास, असा व्यक्तीचा दावा किंवा दावे, काही असल्यास सोडून देण्यात आले आणि / किंवा परित्यक्त करण्यात आले असे मानण्यात येईल आणि सोसायटी **श्रीमती रोमुलडीना लुसीयानो फर्नांडीस** यांच्या नावावर शेअर हस्तांतरणाची प्रक्रिया करण्यात येईल.

मा. सचिव
न्यू करंजीया हाऊस प्रिमायसेस को - ऑप. सोसायटी लि.,
६५३-ए, जेएसएस रोड, धोबी तलाव, मुंबई - ४००००२.

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची भूमिका स्पष्ट करा

उच्च न्यायालयाचे सरकारला निर्देश

■ मुंबई

मराठ्यांना देण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्राविरोधात दाखल जनहित याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश हायकोर्टाने राज्य सरकारला दिले आहेत. ओबीसी कल्याण संघटनेचे अध्यक्ष मंगेश ससाणे यांच्यामार्फत ही याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. या याचिकेला विरोध करणारे अर्जही हायकोर्टात दाखल झाले आहेत. मात्र या अर्जांची प्रत अन्य पक्षकारांना अद्याप मिळालेली नाही. ही प्रत उपलब्ध करून देण्याचे निर्देशही हायकोर्टाने या अर्जदारांना दिलेत. यांच्या याचिकेवर प्रत्युत्तर सादर केले आहे का, अशी विचारणा मुख्य न्यायमूर्तींनी राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांना केली. त्यावर या याचिकेचे प्रत्युत्तर सादर झालेले नाही, असे

महाधिवक्ता सराफ यांनी स्पष्ट केले. याची नोंद घेत हायकोर्टाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ जूनपर्यंत तहकूब केली. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २६ जानेवारी २०२४ रोजी अधिसूचना जारी केली आहे.

त्याद्वारे मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत या अधिसुचनेद्वारे लोकांच्या हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. १६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झाली. राज्य सरकारच्या या अधिसचूनेत मराठ्यांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊ नका, मराठ्यांना दिलेले कुणबी प्रमाणपत्र स्थगित करा, अशी प्रमुख मागणी या याचिकेतून दाखल करण्यात आली आहे.

महाबळेश्वरच्या वेण्णा लेकमध्ये पर्यटकांसाठी १६ बोटी दाखल

■ कराड

सातारा जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरमधील पालिकेच्या वेण्णा तलावात आता ड्रॅगन, फ्लेमिंगो, राजहंस, बदक आणि मोटार आदी विविध आकारात सुमारे १६ बोटी दाखल झाल्या आहेत.

पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी अनोखा उपक्रम राबवला आहे. त्यानिमित्ताने उन्हाळी हंगामातील पर्यटकांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज आहे. पर्यटकांचे सर्वात आवडते ठिकाण म्हणून वेण्णा लेक ओळखले जाते. पालिका प्रशासनाने बदक, राजहंस, फ्लेमिंगो, ड्रॅगन व मोटार आदी आकारात सुमारे ५५ बोटी मागवल्या आहेत.

जाहीर सूचना

माझे अशील श्री. संजय विक्रम गुप्ता यांच्या सूचनेअंतर्गत सूचना देण्यात येत आहे, जे गाव बोर्ला, एन. बी. पाटील मार्ग, घाटला, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ च्या सीटीएस क्र. ६४० (भाग) आणि ६४०/२३ ते ६४०/४२ येथील जॉली लॅण्ड सीएचएस लि. मधील बंगलो क्र. ११ चा भाग असणारी [illegible]

[illegible]

अभिषेक के. पारेख
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. ११ आणि १६, जयंत मार्केट, चेंबूर रेल्वे स्टेशनजवळ, चेंबूर, मुंबई ४०००७१.

जाहीर सूचना

माझे अशील श्री. विक्रम विनोद गुप्ता यांच्या सूचनेअंतर्गत सूचना देण्यात येत आहे, जे गाव बोर्ला, एन. बी. पाटील मार्ग, घाटला, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ च्या सीटीएस क्र. ६४० (भाग) आणि ६४०/२३ ते ६४०/४२ येथील जॉली लॅण्ड सीएचएस लि. मधील बंगलो क्र. ११ चा भाग असणारी २ या मजल्यावरील [illegible]

[illegible]

अभिषेक के. पारेख
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. ११ आणि १६, जयंत मार्केट, चेंबूर रेल्वे स्टेशनजवळ, चेंबूर, मुंबई ४०००७१.

जाहीर सूचना

माझे अशील श्री. विक्रम विनोद गुप्ता यांच्या सूचनेअंतर्गत सूचना देण्यात येत आहे, जे गाव बोर्ला, एन. बी. पाटील मार्ग, घाटला, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ च्या सीटीएस क्र. ६४० (भाग) आणि ६४०/२३ ते ६४०/४२ येथील जॉली लॅण्ड सीएचएस लि. मधील बंगलो क्र. ११ च भाग असणारी ३ या मजल्यावरील [illegible]

[illegible]

अभिषेक के. पारेख
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. ११ आणि १६, जयंत मार्केट, चेंबूर रेल्वे स्टेशनजवळ, चेंबूर, मुंबई ४०००७१.

चोरट्यांचा जीवघेणा पाठलाग! विषारी इंजेक्शन देऊन हत्या

■ मुंबई

लोकलमध्ये सुरक्षिततेसाठी तैनात असलेल्या पोलीस कॉन्स्टेबलचा चोरट्यांनी केलेल्या प्राणघातक हल्ल्यात मृत्यू झाला. माटुंगा स्थानकाजवळ चोरट्यांनी या पोलीस कॉन्स्टेबलवर प्राणघातक हल्ला केला होता. या पोलीस कॉन्स्टेबलला चोरट्यांनी विषारी इंजेक्शन दिल्यामुळे मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. विशाल पवार असे या पोलीस कॉन्स्टेबलचे नाव आहे.

पोलीस कॉन्स्टेबल विशाल पवार नेहमीप्रमाणे रविवारी रात्री कामावर जात होते. त्यावेळी ते लोकलमधून प्रवास करत होते. सायन आणि माटुंगा स्थानकादरम्यान ते लोकलच्या दरवाज्यात उभे राहून फोनवर बोलत होते. त्यावेळी एका व्यक्तीने विशाल पवार यांच्या हातावर फटका मारला. तो त्यांचा मोबाईल घेऊन पळाला होता. मोबाईल चोराला पकडण्यासाठी विशाल पवार यांनी ट्रेनमधून उडी मारली. त्यांनी मोबाईल चोराचा पाठलाग सुरू केला. मात्र, पुढे दबा धरून बसलेल्या चोरांनी विशाल पवार यांना घेरले. त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला.

या चोरट्यांनी पोलीस कॉन्स्टेबल विशाल पवार यांना पकडून त्यांच्या पाठीत विषारी इंजेक्शन दिले. यामुळे विशाल पवार बेशुद्ध पडले. त्यांना तब्बल १२ तासांनी शुद्ध आली. परंतु, घरी गेल्यावर मात्र विशाल पाटील यांची प्रकृती खालावली. त्यांना तातडीने ठाण्याच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यावेळी उपचारादरम्यान विशाल पवार यांचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी कोपरी पोलिसांनी विशाल पवार यांचा जबाब घेतला होता. या प्रकरणाचा पुढील तपास दादर जीआरपीकडे वर्ग करण्यात आला आहे.

जिल्हा न्यायाधीश, डी. के. मंगळुरु यांच्या न्यायालयामध्ये

पी अँण्ड एससी क्र. ०१/२०२४

मयत चार्ल्स ग्रेगोरी रेगो यांच्या मालमत्तेच्या प्रकरणामध्ये, गॅब्रियल कंपाऊंड, अलापे गाव, पडील पोस्ट, मंगळूरु - ५७५००७

दरम्यान : -

दिलीप पिंचा ... याचिकाकर्ता

आणि

आशिष डॉमिनिक रेगो आणि इतर ... प्रतिवादी

ज्यांच्याशी संबंधित असेल त्यांच्यासाठी

नोंद घ्या की, उपरोक्त नामित याचिकाकर्त्याने न्यायालयाकडे मयत चार्ल्स ग्रेगोरी रेगो, ज्यांचे १५.१०.२०२३ रोजी अंधेरी पश्चिम, बृहन्मुंबई, मुंबई उपनगर, महाराष्ट्र येथे निधन झाले, यांचे मृत्युपत्रमान देण्यासाठी अर्ज केला आहे आणि म्हणून सदर याचिका १५.०६.२०२४ रोजी स. ११.०० वाजता या न्यायालयासमोर सुनावणीसाठी ठेवण्यात आली आहे.

त्याला विरोध करण्यास इच्छुक व्यक्तींनी, त्यांची हरकत असल्यास सदर दिनांक आणि वेळेला सदर न्यायालयाच्या समोर दाखल करावी, कसूर केल्यास प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि निर्णय देण्यात येईल.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायालयाच्या शिक्क्यानिशी, २९ एप्रिल, २०२४ रोजी दिले.

याचिकाकर्त्याचे वकील

//न्यायालयाच्या आदेशान्वये//

याचिकाकर्त्याचे वकील

शिक्का

मुख्य प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा न्यायाधीश, डी. के. मंगलोर

जाहीर सूचना

[illegible]

सही/-
मा. सचिव
रामेश्वर मीडिया

कर्जतमधील गुंडगे ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

■ कर्जत

डम्पिंग ग्राऊंडबाबत सकारात्मक उपाययोजना न केल्यामुळे कर्जत नगरपरिषद हद्दीतील हजारो लोक संतप्त झाले असून, त्यांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामस्थांच्या या निर्णयामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात खळबळ उडाली असून, यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून गुंडगे गावालगत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडमुळे स्थानिक रहिवाशी त्रस्त झाले आहेत. अनेकांना श्वसनाचे विकार होत आहेत. तर शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक झाल्या आहेत. या घाणीमुळे परिसराचा विकास खुंटला आहे. त्यामुळे हे डम्पिंग ग्राऊंड हटवण्याची मागणी होत आहे. तरीही कर्जत नगरपरिषद याची दखल घेत नाही. डम्पिंग ग्राऊंड पर्यायी जागेवर हलवावे, या मागणीसाठी संघर्ष समितीने कर्जत नगरपरिषद कार्यालयावर गेल्यावर्षी १२ जानेवारी रोजी भव्य आक्रोश मोर्चा काढला होता. शिवाय कर्जत-खालापूर विधानसभेच्या आमदारांना यंदा २६ जानेवारी रोजी पत्र दिले होते. यंदा १८ मार्चलाही जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले होते. तरीही या ग्रामस्थांच्या समस्येकडे कुणीच लक्ष दिलेले नाही.

अपघात प्रकरणातील आरोपीला कोठडी

उरण- उरण रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण अपघातातील आरोपी जय चंद्रहास घरत याला काल उरण पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने जय घरत यास ६ दिवसांची पोलीस कस्टडी सुनावली आहे. उरण रेल्वे स्थानकासमोर ६ एप्रिल रोजी एका भरधाव वाहनाने स्कुटरला धडक दिल्याने पती-पत्नीचा मृत्यू तर तीन वर्षांची चिमुरडी जबर जखमी होण्याची घटना घडली.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, मे. एम. एस. इंजिनियरिंग वर्क्स [illegible]

[illegible]

दिनांक: ०३.०५.२०२४
ठिकाण: मुंबई

सही/-
श्री. रोहित बसंत शिंदे
ॲडव्होकेट उच्च न्यायालय

फॉर्म बी - जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)
"एजेएस इंपेक्स प्रायव्हेट लिमिटेड"च्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	एजेएस इंपेक्स प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक	८ मे, २००६
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक - मुंबई
४.	कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक	U74900MH2006PTC161680
५.	कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	[illegible]
६.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमापनाचा दिनांक	३० एप्रिल, २०२४
७.	कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक	३० एप्रिल, २०२४
८.	परिसमापक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	विरेंद्र कुमार अग्रवाल IBBI/IPA-001/IP-P00564/2017-18/11040
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल	[illegible]
१०.	परिसमापकासह पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	[illegible] ईमेल: cirp.ajsimpex@gmail.com
११.	दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक	३० मे, २०२४

[illegible]

दिनांक: ३ मे, २०२४
ठिकाण: मुंबई

सही/-
विरेंद्र कुमार अग्रवाल
एजेएस इंपेक्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
IBBI/IPA-001/IP-P00564/2017-18/11040

INDUSIND BANK LIMITED
Regd. Office : 2401, General Thimmayya Road, Cantonment, Pune-411 001.
Secretarial & Investor Services : 701 Solitaire Corporate Park, 167 Guru Hargovindji Marg, Andheri (E), Mumbai-400 093.

NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE(S)

Notice is hereby given that the certificate(s) of **Indusind Bank Ltd.** for the under mentioned securities are stated to have been lost or misplaced and the registered holders have applied to the Bank for issue of duplicate Share certificate(s). Any person who has / have a claim(s) in respect of the said security(ies) should lodge such claim(s) in writing with **R & T Agents of Bank viz. Link Intime India Pvt. Ltd. C-101, 247 Park, L. B. S. Marg, Vikroli (West), Mumbai-400 083** within 7 (Seven) days from this date else the company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

SR. NO.	NAME OF THE SHAREHOLDER	REGISTERED FOLIO NO.	CERTIFICATE NO.	DISTINCTIVE NOS.		NO. OF SHARES
1	HARESH TEJNANI LACHMICHAND TEJNANI	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	2000

(AUTHORISED SIGNATORY)
Place : Mumbai sd/-
Date : 03.05.2024 INDUSIND BANK LIMITED

Rameshwar Media

मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
MANAPPURAM HOME FINANCE LTD.
पूर्वीची मनप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.
सीआयएन: U65923KL2010PLC039179

[illegible] www.manappuramhomefin.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

[illegible]

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्र./शाखा	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन, ज्याचा संबंधात हितसंबंध बनविले आहेत	मागणी सूचना पाठविल्याचा दिनांक आणि थकबाकी रक्कम	ताब्याचा दिनांक
१	जमाल गुलाम मोहम्मद शेख, रोशनबी जमाल शेख, राजू लालू जाधव /NHL00210006838/कल्याण	[illegible]	१२.०२.२०२४ आणि रु. ११,९८,२३४/-	२७.०४.२०२४

दिनांक: ३ मे, २०२४
ठिकाण: महाराष्ट्र

सही/-
प्राधिकृत अधिकारी
मनप्पुरम होम फायनान्स लि.

सूचना

समस्त जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, अधोस्वाक्षरीकार ॲडव्होकेट (१) श्रीमती हिना गिरीष पटेल, (२) श्री. प्रदीप मनुकांत पटेल आणि (३) श्री. कनक मनुकांत पटेल, राहणार : फ्लॅट क्र. २७, मनू स्मृती बिल्डींग, वांद्रे (पश्चिम), जरीमरी मंदिराच्या जवळ, एस. व्ही. रोड, मुंबई - ४०० ०५०, सर्व भारतीय रहिवासी यांच्या निम्नलिखीत परिशिष्टामध्ये अधिक तपशिलवार वर्णित मालमत्तेच्या संदर्भात अन्वेषण करीत आहेत.,

सर्व व्यक्ती, ज्यांना सदर मालमत्ता किंवा तीच्या कोणत्याही भागावर, विक्री, अदलाबदल, तारण, भाड्याने देणे, पट्टा, धारणाधिकार, प्रभार, परिरक्षण, अनुज्ञप्ती, उपहार, वारसाहक्क, हिश्श्याचा ताबा, सुविधाधिकार, न्यास, मृत्युपत्रीत ताबा, अभिहस्तांकन किंवा कोणत्याही स्वरूपातील भार किंवा अन्यथा कोणताही अधिकार, हक्क, दावा, मागणी किंवा निहीत स्वारस्य असल्यास किंवा दावा करित असल्यास, सदर प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसात सर्व आवश्यक आणि आधारभूत दस्तावेजांच्या सोबत असा असलेला कोणताही दावा याद्वारे खालील नमूद पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकारांना लेखी कळविण्याची विनंती करण्यात येत आहे, कसूर केल्यास कोणताही दावा नाही आणि जर असेल तर, सोडून देण्यात आला असे समजण्यात येईल आणि निम्नस्वाक्षरीकार त्या संदर्भात हक्क प्रमाणपत्र वितरीत करतील.

मालमत्तेचे परिशिष्ट

''मनू स्मृती'' म्हणून ज्ञात तळ अधिक चार मजली त्यावर उभ्या संरचने सोबत, एफ/वॉर्ड, ब्लॉक क्र. २७, एस. व्ही. रोड, जरीमरी मंदिराच्या जवळ, वांद्रे तलावाच्या जवळ, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०००५० येथील सीटी सर्व्हे क्रमांक एफ/११६४ धारक सरासरी मोजमापित ३७६ चौ. मीटर्सच्या जमिनीचे सर्व अंगिकृत भाग आणि त्याला संलग्न सर्व अधिकार व लाभ.

दि. ३ मे २०२४

प्रिझम लिगल करिता
सही/-
ॲडव्होकेट निलम सालस्तेकर
प्रिझम लिगल, कार्यालय क्र. १०, २ रा मजला, करीमजी बिल्डींग, एम. जी. रोड, फोर्ट,
मुंबई : ४००००१. मोबा.- ९८२०५९६१९०